www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Series

D

OCT-01226
Paper-II
MARATHI

Question Booklet Serial No.
प्रश्नपत्रिका अनुक्रमांक

Signature and Name of Invigilator

1. (Signature) .....
   (Name) .....
2. (Signature) .....
   (Name) .....

Seat No. | | | | | | | | |
(In figures as in Admit Card)

Seat No. .....
(In words)

OMR Sheet No. | | | | | | |
(To be filled by the Candidate)

Time Allowed : 2 Hours] **[Maximum Marks : 200**

Number of Pages in this Booklet : **16**

Number of Questions in this Booklet : **100**

Instructions for the Candidates

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **100** objective type questions. **Each** question will carry **two** marks. **All** questions of Paper II will be **compulsory**.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (i) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. **Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.**
   (ii) Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. **Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes.** Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.
   (iii) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   Example : where (B) is the correct response.
   (A) ● (C) (D)
   Following wrong methods should not be used as they are not recognised by scanning machine in digitized assessment. Candidate using such method will be responsible for their loss.

WRONG METHODS
(A) ✓ (C) (D) (A) ✗ (C) (D) (A) ● (C) (D) (A) (B) (C) (D)

5. Your responses to the items are to be indicated in the OMR Sheet given inside the Booklet only. If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. Use of any calculator or log table, etc., is prohibited.
12. There is no negative marking for incorrect answers.

विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना

1. परीक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या OMR उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत **100** बहुविकल्प प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनिटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात :
   (i) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. **स्टीकर सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्वीकारू नये.**
   (ii) पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. **पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/ प्रश्नांचा चुकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी.** त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.
   (iii) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पाहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा क्रमांक लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   उदा. : जर (B) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) ● (C) (D)
   खालील चुकीच्या पद्धती वापरू नये, कारण डिजिटाइज्ड (Digitized) मूल्यांकनात स्कॅनिंग मशीन त्यांना ओळखत नाही. त्या पद्धती वापरून नुकसान झाल्यास त्यास विद्यार्थीच जबाबदार असतील.

चुकीची पद्धती
(A) ✓ (C) (D) (A) ✗ (C) (D) (A) ● (C) (D) (A) (B) (C) (D)

5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत**. इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेवर नमूद केलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापि, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.
12. चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.

D

Prepp
Your Personal Exams Guide



Prepp
Your Personal Exam Guide

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

OCT-01226–D

Marathi
Paper II
मराठी
प्रश्नपत्रिका II

Time Allowed : 120 Minutes] **[Maximum Marks : 200**

Note : This Paper contains **Hundred (100)** multiple choice questions. Each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

सूचना : या प्रश्नपत्रिकेत **शंभर (100)** बहुविकल्प प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. सर्व प्रश्न सोडवा.

1. राजशेखराचा महाराष्ट्री प्राकृतातील ग्रंथ कोणता आहे ?
   (A) हरिविजय
   (B) कर्पूरमंजिरी
   (C) लीलावई
   (D) गाथासत्तसई

2. मधू लिमये यांच्या आत्मचरित्राचे नाव काय आहे ?
   (A) आत्मकथा
   (B) वारसा
   (C) कृष्णाकाठ
   (D) सफर

3. ललितलेखनसंग्रह आणि लेखक यांच्या योग्य जोड्या लावा.

a. शुभ्र काही जीवघेणे	1. शरदिनी डहाणूकर
b. कदंब	2. रामदास भटकळ
c. जिगसॉ	3. अंबरीश मिश्र
d. वृक्षगान	4. विजया राजाध्यक्ष

	a	b	c	d
(A)	4	3	1	2
(B)	2	3	4	1
(C)	3	4	2	1
(D)	1	4	3	2

4. पुढीलपैकी सदानंद देशमुख यांचे कथासंग्रह कोणते आहेत ?
   (A) उदक, महालूट
   (B) हजार बेलपाने, उठावण
   (C) उदक, हजार बेलपाने
   (D) उठावण, महालूट

5. 'रेनयेकर ऑफ रोमान्स' या अमेरिकन नाटकावर आधारलेले विजय तेंडुलकर यांचे नाटक कोणते आहे ?
   (A) श्रीमंत
   (B) माणूस नावाचे बेट
   (C) अशी पाखरे येती
   (D) कन्यादान

6. 'लघु अनियतकालिकांच्या चळवळीने महत्त्वाचे कवी-लेखक निर्माण केले आणि व्यवस्थेने त्यांचे झपाट्याने दैवतीकरण केले', हे विधान कोणी मांडले आहे ?
   (A) किशोर सानप
   (B) हरिश्चंद्र थोरात
   (C) चंद्रकांत पाटील
   (D) भालचंद्र नेमाडे

www.prepp.in

7. मराठी भाषेत ताडपत्रावर लिहिलेला ज्ञात ग्रंथ कोणता आहे ?

(A) ज्योतिषरत्नमाला

(B) संख्यारत्न कोश

(C) कलानिधी

(D) गद्यराज स्तोत्र

8. मराठीत साहित्य अकादमीचा पुरस्कार सर्वप्रथम कोणत्या ग्रंथास प्राप्त झाला ?

(A) सौंदर्य आणि साहित्य

(B) वैदिक संस्कृतीचा इतिहास

(C) बहुरूपी

(D) ययाती

9. 'नाथपंथीय गहिनीनाथांनी महाराष्ट्रात नाथपंथाचा व वारकरी संप्रदायाचा समन्वय केला. श्रीकृष्णच विठ्ठलरूप असल्याने गहिनीनिवृत्तीप्रभुती नाथसिद्धांनी विठ्ठलभक्तीवर भर दिला,' असे मत कोणी मांडले आहे ?

(A) म. रा. जोशी

(B) न. म. जोशी

(C) वसंत स. जोशी

(D) वि. कृ. जोशी

10. ग्रंथ आणि ग्रंथकार यांच्या जोड्या लावा.

a. इतिहास प्रसिद्ध पुरुषांचे व स्त्रियांचे पोवाडे	1. गेल ऑमव्हेट
b. माझ्या आठवणी व अनुभव	2. शं.गो. तुळपुले
c. देवनागरी मुद्राक्षर लेखनकला	3. आनंदीबाई कर्वे
d. वासाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड	4. बापुराव नाईक
	5. शंकर तुकाराम शाळीग्राम
	6. विठ्ठल रामजी शिंदे

	a	b	c	d
(A)	5	6	4	1
(B)	5	3	4	1
(C)	4	3	5	1
(D)	4	6	5	1

11. 'पोवाड्या'तील चरणांच्या एकेका परिच्छेदाला कोणत्या संज्ञेने संबोधले जाते ?

(A) चौक

(B) छंद

(C) आवर्तन

(D) कडाका

www.prepp.in

12. 'चरित्रात्मक समीक्षे' चा उद्‌गाता कोण आहे ?
(A) मॉड बॉडकिन
(B) वॉल्टर बेंजामीन
(C) जोनाथन कलर
(D) सॅन्त बव्ह

13. पुढीलपैकी कोणत्या आत्मचरित्रात तृतीय पुरुषी निवेदन पद्धती योजलेली आहे ?
(A) एक झाड आणि दोन पक्षी
(B) बंध-अनुबंध
(C) उपरा
(D) आयदान

14. पुढीलपैकी कोणत्या समीक्षकाने आस्वादक समीक्षेचा पुरस्कार केला आहे ?
(A) गंगाधर गाडगीळ
(B) मिलिंद मालशे
(C) रा. भा. पाटणकर
(D) रमेश धोंगडे

15. र. कृ. जोशी यांनी कवितेला कोणते वेगळे परिमाण दिले ?
(A) भावपूर्णता
(B) दृश्य प्रतिमात्मकता
(C) समाजसन्मुखता
(D) पत्रात्मकता

16. दत्ता भगत हे प्रख्यात नाटककार असून त्यांनी उत्तम दर्जाचे कथा लेखन ही केले आहे.
(A) संपूर्ण विधान बरोबर
(B) संपूर्ण विधान चूक
(C) पूर्वार्ध बरोबर उत्तरार्ध चूक
(D) पूर्वार्ध चूक उत्तरार्ध बरोबर

17. पुढीलपैकी कोणत्या नियतकालिकेतून बाबूराव बागूल यांच्या कथा प्रकाशित झाल्या होत्या ?
(A) समुचित
(B) युगांतर
(C) किर्लोस्कर
(D) मनोहर

18. शाहीर भाऊ फक्कड यांच्या जीवनावर आधारलेली कादंबरी कोणती ?
(A) भाऊराव
(B) वगसम्राट
(C) फक्कडगाथा
(D) तमशासम्राट

19. केवळ पात्रांच्या संवादातून साकार झालेल्या श्री. ना. पेंडसे याच्या कादंबरीचे नांव सांगा.
(A) रथचक्र
(B) ऑक्टोपस
(C) हद्दपार
(D) लव्हाळी

20. 'एका नृत्याचा जन्म' हा श्री. दा. पानवलकर यांचा कथासंग्रह कोणत्या साली प्रकाशित झाला ?
(A) इ. स. १९६८
(B) इ. स. १९७५
(C) इ. स. १९८०
(D) इ. स. १९८२

www.prepp.in

21. 'प्रत्येक चिनी नदीला/अर्थातच वाटत असेल अधूनमधून/नाही असं नाही/की मी/माझ्या मर्जीनुसार वागते', या काव्यओळी अरूण कोलटकर यांच्या 'भिजकी वही' या संग्रहातील कोणत्या कवितेतील आहेत ?
(A) पो-च्यु-ई
(B) Hypatia
(C) किम
(D) सूझन

22. "किसनच्या या प्रेमळ भाषणाने तिचे हृदय आनंदाने भरून येण्याऐवजी रागाने खदखदू लागले. ती आवाज ताब्यात ठेऊन खोट्या अज्ञानाने म्हणाली-"किसनराव तुमची जात काय हो ?" हा प्रसंग 'जेव्हा मी जात चोरली होती!'. या कथासंग्रहातील कोणत्या कथेत आला आहे ?
(A) काळोखाचे कैदी
(B) गुंड
(C) स्पर्धा
(D) पेसूक

23. 'खुंटीवरचा लांबसडक चाबूक खांद्यावर टाकून शर्यतीसाठी गाडीत चढणारा हरीबा' वळीव कथा संग्रहातील कोणत्या कथेत साकार झाला आहे ?
(A) भूल
(B) सूड
(C) खेळ
(D) प्रतीक्षा

24. मॅट्रिक झाल्यानंतर मुळाने कोण व्हावे अशी बेबी कांबळे यांच्या पतीची इच्छा होती ?
(A) डॉक्टर
(B) वकील
(C) शेतकरी
(D) इंजिनियर

25. "एकाची वृत्ति एकास सर्वथैव न द्यावी" या आज्ञापत्रातील अवतरणातील 'वृत्ति' या शब्दाचा अर्थ सांगा.
(A) जामिनीचा सारा
(B) धान्याचा संग्रह
(C) निर्वाहाचे साधन
(D) साठवणीचे सामान

26. भामहाने 'काव्यालंकार' या अर्थी पुढीलपैकी कोणता शब्द वापरला आहे ?
(A) काव्यलक्षणम्
(B) काव्यलक्ष्म
(C) काव्यलक्षणकारी
(D) काव्यलक्षणविधायी

27. 'सांत्वन' आणि 'मानसिक विश्रांती' ही भरताला अभिप्रेत असणारी नाट्यप्रयोजने असल्याचे कोणी म्हटले आहे ?
(A) रा. श्री. जोग
(B) वसंत पाटणकर
(C) रा. भा. पाटणकर
(D) स. रा. गाडगीळ

28. प्रतिभेच्या स्वरूपाविषयी विवेचन करताना 'दर्शन' व 'वर्णना' या दोन संकल्पना कोणी मांडल्या आहेत ?
(A) जगन्नाथ
(B) रुद्रट
(C) महिमभट्ट
(D) भट्टतौत

www.prepp.in

29. शाब्दी व्यंजनेचे दोन प्रकार कोणते ?

1. अभिधामूलक
2. वस्तुध्वनि
3. अलंकारध्वनि
4. लक्षणामूलक

(A) 1 आणि 2
(B) 2 आणि 3
(C) 1 आणि 4
(D) 3 आणि 4

30. 'रस हा काव्याचा आत्मा आहे' – असे कोणी म्हटले आहे ?

(A) रामचंद्र
(B) आनंदवर्धन
(C) वामन
(D) गुणचंद्र

31. 'महाभारत' ह्या महाकाव्यास 'प्रभव' स्वरूप असे मानल्यास 'नल–दमयन्ती स्वयंवर' ह्या आख्यानकाव्याचे स्वरूप कोणते मानावे ?

(A) भाषान्तर
(B) अनुवाद
(C) रूपान्तर
(D) प्रभाव

32. 'तौलनिक साहित्याभ्यास' ह्या संज्ञेस 'भ्रामक संज्ञा' असे कोणी संबोधले ?

(A) मॅथ्यू आर्नोल्ड
(B) बुद्धदेव बसू
(C) लेन कूपर
(D) अरविन्द घोष

33. गोविंद विनायक करंदीकर यांनी कोणत्या साहित्य कृतीचे मराठीत भाषान्तर केले **नाही** ?

(A) पोएम्स ऑव्ह विन्दा
(B) ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र
(C) फाउस्ट–प्रथम भाग
(D) जळते रहस्य

34. गझलेतील पहिल्या शेरास 'स्थायी' अन् उर्वरित शेरांस 'अन्तरे' असे म्हणत असतील तर ही नामकरणे कशाची द्योतके होत ?

(A) सांस्कृतिक घटितांपासून लाभलेल्या प्रेरणेची
(B) प्रभवची आणि प्रभावाची
(C) आन्तरभाषा–भगिनी भावसंबंधांची
(D) भारतीयकरणाची

35. मराठी ग्रंथ व इंग्रजीतील भाषांतरीत साहित्यकृती यांच्या सार्थक जोड्या जुळवा :

a. ययाती	1. Routes and Escape routes
b. वावटळ	2. Sixes are Forty Three
c. महानिर्वाण	3. Winds of Fire
d. वाटा–पळवाटा	4. Classic Tale of Lust
	5. The Dread Departure

	a	b	c	d
(A)	3	4	1	5
(B)	4	3	5	1
(C)	1	2	3	5
(D)	2	3	4	5

www.prepp.in

36. शेतकरी संघटनेची स्थापना (१९७९) पुढीलपैकी कोणी केळी आहे ?
(A) शरद जोशी
(B) शरद पाटील
(C) शरद गायकवाड
(D) शरद पोंक्षे

37. "स्त्री ही 'स्त्री' म्हणून स्त्रीवादी असेलच असे नाही. स्त्रियांनी लिहिलेली म्हणून, ती ती पुस्तके स्त्रीवादी ठरत नाहीत."
(A) संपूर्ण विधान बरोबर
(B) संपूर्ण विधान चूक
(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

38. पुढीलपैकी कोणत्या कादंबरीतून बिरसा मुंडा यांचे जीवनचित्रण आलेळे आहे ?
(A) एन्काउंटर
(B) आरण्येर अधिकार
(C) झेलझपाट
(D) आंदोलन

39. 'मुस्लिम साहित्य' असा शब्दप्रयोग सर्वप्रथम कोणी केला ?
(A) फ. म. शहाजिंदे
(B) सय्यद अमीन
(C) हमीद दलवाई
(D) यू. म. पठाण

40. 'जनसाहित्य म्हणजे जनांचे जनवादी साहित्य होय!' अशी जनसाहित्याची व्याख्या पुढीलपैकी कोणी केली आहे ?
(A) सुदाम सावरकर
(B) सदा कऱ्हाडे
(C) या. वा. वडस्कर
(D) तुळशीराम काजे

41. म. द. हातकणंगलेकर यांनी पुढीलपैकी कोणते संपादन केलेले **नाही** ?
(A) विचारधारा
(B) डोह काळीमा
(C) श्री. दा. पानवलकर निवडक कथा
(D) आदिमाया

42. श्रीचक्रधर एका नव्या पंथाची उभारणी करत असताना तत्कालीन महाराष्ट्रात निरनिराळे धार्मिक पंथ आणि संप्रदाय होते. परंतु लीळाचरित्र या ग्रंथात या विविध पंथांचे निर्देश आलेले नाहीत.
(A) संपूर्ण विधान बरोबर
(B) संपूर्ण विधान चूक
(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

43. आरंभी 'विविधवृत्त' 'प्रभात', 'लोकमान्य' या पत्रांतून लेखन केल्यानंतर १९३५ साली 'प्रभात' चे सहसंपादक म्हणून संपादन कार्यास कोणी सुरूवात केली ?
(A) श्री. पु. भागवत
(B) श्रीपाद रामचंद्र टिकेवर
(C) अनंत बाळकृष्ण अंतरकर
(D) मनोहर महादेव केळकर

44. इ. स. २००० साली आयोजित दुसऱ्या विद्रोही साहित्य संमेलनाचे अध्यक्ष कोण होते ?
(A) बाबुराव बागुल
(B) वाहरू सोनवणे
(C) यशवंत मनोहर
(D) आत्माराम राठोड

www.prepp.in

45. अ.का. प्रियोळकर यांनी Incunabula या शब्दाला पुढीलपैकी कोणता मराठी प्रतिशब्द योजला आहे ?
(A) दोलामुद्रित
(B) शीळामुद्रित
(C) हस्तमुद्रित
(D) पासोडी

46. ख्रिस्ती धर्मप्रसारासाठी पुढीलपैकी कोणते नियतकालिक प्रकाशित केले जात असे ?
(A) निकाय
(B) अस्तित्व
(C) प्रमेय
(D) ज्ञानोदय

47. 'एटू लोकांचा देश' हा बालकविता संग्रह कोणी लिहिला आहे ?
(A) सरिता पदकी
(B) ग. दि. माडगूळकर
(C) विंदा करंदीकर
(D) मंगेश पाडगावकर

48. 'संकरित' हा कथासंग्रह पुढीलपैकी कोणी लिहिला आहे ?
(A) बाळ फोंडके
(B) संजय ढोले
(C) जयंत नारळीकर
(D) निरंजन घाटे

49. 'राख' हे आत्मकथन कोणत्या लेखकाने लिहिले आहे ?
(A) फ. म. शहाजिंदे
(B) हुसेन जमादार
(C) फ. ह. बेन्नूर
(D) नसीमा हुरजुक

50. 'जनभाषेच्या शोधात' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे ?
(A) सुभाष सावरकर
(B) नीलकंठ मेंढे
(C) पी. डी. चौधरी
(D) सुधाकर मोहड

51. मराठीचा वाङ्मयेतिहास लेखकनिष्ठ पद्धतीने लिहावा अशी कोणाची भूमिका होती ?
(A) रा. श्री. जोग
(B) श्री. म. माटे
(C) शं. गो. तुळपुळे
(D) वि. वि. पटवर्धन

52. "साहित्याचा इतिहास लिहिताना एकाच भाषक समाजाचे भिन्न स्तर आणि त्या स्तरांमधून झालेली निर्मिती यांचा समावेश झाला तर तो त्या भाषेतील साहित्याचा आणि त्या मानवसमाजाच्या इतिहासाचा एक महत्त्वाचा भागही असतो." हे मत कोणाचे आहे ?
(A) रा. श्री. जोग
(B) रा. ग. जाधव
(C) वसंत आबाजी डहाके
(D) गं. बा. सरदार

53. "इतिहासलेखनासाठी आवश्यक सामग्री गोळा करून नंतर इतिहासलेखनाला सुरूवात करायची की इतिहासलेखनाला सुरूवात करून आवश्यकतेनुसार सामग्री पडताळून पहायची हा इतिहासलेखनांच्या संदर्भातील मोठा पेच आहे." हे विधान कोणी केले ?
(A) दिगंबर पाध्ये
(B) गो. म. कुलकर्णी
(C) अ. ना. देशपांडे
(D) सीताराम रायकर

www.prepp.in

54. "कोणताही विषय न्याय्य पद्धतीने उद्घाटणे, आणि त्याची यथाशक्ती जुळणी करून जे वर्णन करणे तो निबंध होय." ही व्याख्या कोणत्या नियतकालिकात प्रथमत: आली आहे ?
(A) प्रभाकर
(B) मराठी ज्ञानप्रसारक
(C) ज्ञानसिंधू
(D) विविधज्ञान विस्तार

55. 'विमानमंत्री ताम्रपट' या नावाने प्रसिद्ध असणारा ताम्रपट कोणता आहे ?
(A) जालगाव ताम्रपट
(B) दिवेआगर ताम्रपट
(C) खाटेग्राम ताम्रपट
(D) तासगाव ताम्रपट

56. 'पापपुण्य' हा कोणत्या प्रकारचा समास आहे ?
(A) द्विगू
(B) वैकल्पिक द्वंद्व
(C) इतरेतर द्वंद्व
(D) समाहार द्वंद्व

57. एका भाषाकुलातील भाषांमध्ये
(A) अजिबात भिन्नता नसते
(B) आदानप्रदानामुळे आलेला लक्षणीय सारखेपणा असतो
(C) आदानप्रदानामुळे न आलेला लक्षणीय सारखेपणा असतो
(D) अजिबात सारखेपणा नसतो

58. दोन स्वनिम वेगळे काढण्यासाठी भाषाव्यवहारात पुढीलपैकी कोणता आधार असावा लागतो ?
(A) वैधर्म्ययुक्त विनियोग
(B) पूरक विनियोग
(C) वैकल्पिक विनियोग (मुक्त परिवर्तन)
(D) यादृच्छिक वापर

59. प्रत्येकच संभाषण आशयाच्या देवाणघेवाणीसाठी होत असते, तसेच त्यात सामाजिक हेतूंचा काहीही संबंध नसतो.
(A) संपूर्ण विधान बरोबर
(B) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर
(D) संपूर्ण विधान चुकीचे

60. प्रमाण भाषा व बोली यांच्यात पुढीलपैकी कोणता फरक असतो ?
(A) भाषेचे क्षेत्र व्यापक, तर बोलीचे मर्यादित असते.
(B) भाषा शुद्ध, तर बोली अशुद्ध असतात.
(C) भाषा लेखनासाठी उपयोगी पडते, बोलीचा लेखनामध्ये उपयोग करता येत नाही.
(D) भाषेला व्याकरण असते, बोलीला नसते.

61. विशिष्ट ऋतूसंबद्ध आदिम मिथ्यकथांनुसार साहित्यप्रकारांचे वर्गीकरण पुढीलपैकी कोणत्या अभ्यासकाने केले आहे ?
(A) नॉथ्रॉप फ्राय
(B) रेने वेलेक
(C) प्लेटो
(D) बेनीदेत्तो क्रोचे

62. धीट, पाठ व प्रसादिक असे काव्याचे तीन वर्ग कोणी कल्पिले आहेत ?
(A) रामदास
(B) एकनाथ
(C) वामन पंडित
(D) मोरोपंत

www.prepp.in

63. 'एपिक थिएटर' चा प्रवर्तक कोण मानली जातो ?
(A) ब्रेश्ट
(B) बेकेट
(C) सार्त्र
(D) आर्तो

64. 'शैली म्हणजे लेखकच' हे सूत्र कोणी मांडले आहे ?
(A) वॉल्टर बेंजामिन
(B) सुसान लँगर
(C) ब्यूफाँ
(D) वर्ड्सवर्थ

65. 'वर्ग' आणि 'उत्पादन संबंध' या संकल्पना कोणी मांडल्या आहेत ?
(A) जॉर्ज ल्यूकास
(B) फ्रेडरिख नीत्शे
(C) कार्ल मार्क्स
(D) हर्बर्ट रीड

66. ग्रामीण भागातच्या राजकीय वातावरणाचे, सत्ताकांक्षेचे चित्रण करणारी कोणती कलाकृती शंकर पाटील यांनी लिहिलेली आहे ?
(A) वळीव
(B) धिंड
(C) टारफुला
(D) खुळ्याची चावडी

67. मराठी गद्याच्या पौराणिक परंपरेशी बखरवाङ्मयाचे नाते जोडून विवेचन करणारे लेखक कोण ?
(A) बापूजी संकपाळ
(B) र. वि. हेरवाडकर
(C) पां. ना. कुलकर्णी
(D) श्री. रं. कुलकर्णी

68. "पालख पाळणा, मोत्याचा खेळणा
जोजविते अतिबाई, लाडका चिमणा
शिपांचा मळीबाई स्वातीनं शिंपला
मोती टिपून तुझ्या छताला गुंफला."
हे लोकगीत कोणत्या कलाप्रकारात मोडते ?
(A) फुगडीगीत
(B) भलरीगीत
(C) अंगाईगीत
(D) पाळणा गीत

69. पुढीलपैकी कोणत्या शाहिरास करवीरचे छत्रपती शाहू महाराजांनी आश्रय दिलेला होता ?
(A) भीमराव महामुनी
(B) शाहीर जंगमस्वामी
(C) शाहीर पांडुरंग वनमाळी
(D) शाहीर लहरी हैदर

70. 'सिंहासनबत्तिशी' (विक्रमार्कचरित्) मधील सिंहासनाच्या पुतळ्या कोणत्या राजाशी बोलतात ?
(A) विक्रमराजा
(B) भोजराजा
(C) विद्याधर राजा
(D) विक्रमादित्यराजा

71. 'भारतीयता' या संकल्पनेत–भारतीय भूमी, जन, संप्रभुता, भाषा एवं संस्कृती ही अनिवार्य तत्त्वे होत, त्यामुळे सदैव सात्विकतेचा, आनंदमयतेचा प्रत्यय मात्र येत **नाही**.
(A) संपूर्ण विधान बरोबर
(B) संपूर्ण विधान चूक
(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

www.prepp.in

72. प्राचीनतम साहित्यकृती व तिच्या संदर्भातील भाषा यांच्या सार्थक जोड्या जुळवा :

a. कविराजमार्ग	1. मलयालम
b. भरतेश्वर बाहुबलिरास	2. असमिया
c. हरिगौरी–संवाद	3. गुजराती
d. रामचरितम्	4. कन्नड
	5. हिंदी

	a	b	c	d
(A)	1	2	3	4
(B)	4	3	2	1
(C)	3	2	1	4
(D)	2	1	4	3

73. 'भाषान्तर' आणि 'अनुवाद' ह्या संज्ञा हल्ली समानार्थक स्वरूपात उपयोजत असले तरी 'भाषान्तर' हा शब्द संस्कृत भाषेत त्या अर्थी **नाही**.
(A) संपूर्ण विधान बरोबर
(B) संपूर्ण विधान चूक
(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

74. ग्रंथ प्रकाशन काळाचा योग्य अनुक्रम लावा :
(A) भाषान्तरमीमांसा; तौलनिक साहित्य : नवे सिद्धान्त आणि उपयोजन; तौलनिक साहित्याभ्यास; तौलनिक साहित्याभ्यास : तत्त्वे आणि दिशा
(B) तौलनिक साहित्य : नवे सिद्धान्त आणि उपयोजन; तौलनिक साहित्याभ्यास : तत्त्वे आणि दिशा; तौलनिक साहित्य; भाषान्तरमीमांसा
(C) तौलनिक साहित्याभ्यास : तत्त्वे आणि दिशा ; तौलनिक साहित्य; भाषान्तरमीमांसा; तौलनिक साहित्य : नवे सिद्धान्त आणि उपयोजन
(D) तौलनिक साहित्याभ्यास; तौलनिक साहित्याभ्यास : तत्त्वे आणि दिशा ; भाषान्तरमीमांसा; तौलनिक साहित्य : नवे सिद्धान्त आणि उपयोजन

75. भाषिक तुलनेसाठी आदर्श स्थिती म्हणजे तुलनाकाराने स्वत: द्विभाषिक अथवा बहुभाषिक असून त्या त्या वाङ्मयकृती मूळ स्वरूपात स्वत: अभ्यासलेल्या असणे ही होय, असे कोणत्या अभ्यासक्षेत्रास उद्देशून म्हटले जाते ?
(A) व्याकरणशास्त्र
(B) तौलनिक साहित्याभ्यास
(C) भाषाविज्ञान
(D) भाषान्तरमीमांसा

76. रोमान याकबसनने भाषिक संदेशनाचे पुढीलपैकी कोणते घटक सांगितले आहेत ?
(A) प्रेषक, चेतक, संवेदक
(B) संदेश, प्रेषक, ग्रहणकर्ता
(C) संदर्भ, ऐतिहासिक परंपरा, मध्यस्थ
(D) संदेश, तंत्र, माध्यम

77. लिखित साहित्यापेक्षा मौखिक साहित्याच्या आकृतीबंधावर निर्बंध येण्याचे महत्त्वाचे कारण पुढीलपैकी कोणते ?
(A) बोलण्यावर मर्यादा पडतात
(B) परंपरेचा मान राखावा लागतो
(C) ते मुखोद्‌गत करावयाचे असते
(D) सर्वांना बोलण्यास संधी द्यावी लागते

78. साहित्याच्या भाषेतील नाद, यमक, अनुप्रास इ. तत्त्वांकडे दिलेले लक्ष म्हणजे _____ होय.
(A) ध्वनिपातळीवरील नियमोल्लंघन
(B) अर्थपातळीवरील नियमोल्लंघन
(C) व्यवहारभाषेतील नियमांचे अनुसरण
(D) व्यवहारभाषेतील लयीचे अनुसरण

www.prepp.in

79. कृ. श्री. अर्जुनवाडकर यांच्या मते, शब्दांच्या पारंपरिक आठ जातीऐवजी कोणते मूलभूत वर्ग मानावेत ?

(A) सर्व आठ वर्ग मानणे जरूर आहे

(B) प्रकृती व प्रत्यय हे दोन वर्ग

(C) नामिके, धातू व शेष हे तीन वर्ग

(D) नामिके, विशेषणे, धातू व प्रत्यय हे चार वर्ग

80. प्रयोगविचार करणे म्हणजे _____ होय.

(A) वाक्यातील कर्ता शोधणे

(B) वाक्यातील कर्म शोधणे

(C) वाक्यातील पदान्वयाचा प्रकार शोधणे

(D) वाक्यातील वेगळेपणा शोधणे

81. 'त्याची भगवी वस्त्रे कधी विटलेली नसत आणि स्वच्छही असत, असे आनंदओवरी' त कोणाबद्दल म्हटलेले आहे ?

(A) रामेश्वरभट

(B) मंबाजी

(C) भामनाथ

(D) जगनाडे

82. 'बनगरवाडी' त "हिचे सरके लावून दे", असे कोणी कोणाला म्हटले ?

(A) जगन्याने आनंदाला

(B) बिरा धनगराने शेकूला

(C) दोन-चार जबाबदार लोकांनी जगन्याला

(D) म्हाताऱ्या कारभाऱ्याने शेकूला

83. 'स्मृतिचित्रे' पुढीलपैकी कोणत्या विशेषांमुळे महत्वाचे ठरले आहे ?

(A) प्रांजळपणा व विनोदबुद्धी

(B) प्रांजळपणा व विद्रोहीपणा

(C) बंडखोरी व सूक्ष्म समाजविश्लेषण

(D) समाजदर्शन व भारदस्त शैली

84. 'हिंदु-जगण्याची समृद्ध अडगळ' या कादंबरीचा नायक कोणत्या मोहिमेत सहभागी झाला आहे ?

(A) सिंधी संस्कृती उत्खनन

(B) हडाप्पा उत्खनन

(C) मोहेंजोदारो उत्खनन

(D) बलुचिस्तान उत्खनन

85. 'पायी चालणार' या कवितासंग्रहातील कोणती कविता मुंगीचा वेध घेणारी आहे ?

(A) जोखीम पत्करून

(B) रस्ते कसे

(C) पायी चालणार

(D) राहू देतो कित्येकांना सोबत

www.prepp.in

86. "लघुपत्रिका चळवळ ही साठोत्तर कालखंडातील मराठी साहित्यातील परिवर्तनाची नांदी ठरली नाही. परंतु कोल्हटकर, चित्रे, नेमाडे, उहाके यांच्यासारखे प्रतिभावंत नव्या दमाने आपल्या स्वतंत्र वाङ्मयीन बैठकीसह पुढे आहे."
(A) संपूर्ण विधान बरोबर
(B) संपूर्ण विधान चूक
(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

87. 'आदिवासी साहित्य हे केवळ मराठी साहित्याचेच नव्हे, तर विश्वसाहित्याचे वैभवसेणे आहे', असे कोणी म्हटले आहे ?
(A) वाहरू सोनवणे
(B) गोविंद गारे
(C) विनायक तुमराम
(D) भुजंग मेश्राम

88. "देश पारतंत्र्यात होता, तेव्हा खेडी स्वतंत्र होती आता देश स्वतंत्र झाला, पण खेडी मात्र पारतंत्र्यात गेली." असे विधान कोणी केले आहे ?
(A) साने गुरुजी
(B) कर्मवीर भाऊराव पाटील
(C) महात्मा गांधी
(D) आचार्य विनोबा भावे

89. पुढीलपैकी कोणत्या कादंबरीतून ग्रामीण साहित्याच्या चळवळीवर मार्मीक आणि मूलभूत भाष्य केले आहे ?
(A) दुर्दम्य
(B) नटरंग
(C) पाचोळा
(D) रथ

90. 'अनार्य दोष परिहारक मंडळा' ची स्थापना पुढीलपैकी कोणी केली आहे ?
(A) रामचंद्र विठोबा धामणस्कर
(B) महात्मा जोतीराव फुले
(C) गोपाळबुवा वलंगकर
(D) दिनकरराव जवळकर

91. 'दृष्टान्तपाठा' तील 'दार्ष्टान्तिक' कोणी लिहिले ?
(A) नागदेवाचार्य
(B) भावेदेवव्यास (बाइदेवव्यास)
(C) केशिराजव्यास
(D) दामोदरपंडित

92. 'काव्याचा आत्मा जो रस त्याचा ज्ञानेश्वरीत अभाव' असल्यामुळे तत्त्वदृष्ट्या त्यास कोण काव्य मानावयास तयार **नाही** ?
(A) रा. श्री. जोग
(B) मा. गो. देशमुख
(C) रा. शं. वाळिंबे
(D) ग. श्री. हुपरीकर

93. 'सुहारावर्दीसंप्रदाय' या सूफी संप्रदायाच्या शाखेची बाराव्या शतकात इराकमध्ये कोणी स्थापना केली ?
(A) बहाउद्दीन झकारिया
(B) अब्दुल कादर गिलानी
(C) नजीबुद्दीन
(D) अमीर खुस्रो

www.prepp.in

94. पंडित कवी आणि त्यांच्या साहित्यकृती यांच्या जोड्या जुळवा.

a. निगमसार	1. विठ्ठल बीडकर
b. मुद्गलाख्यान	2. वामनपंडित
c. रुक्मिणीस्वयंवर	3. सामराज
d. रसमंजरी	4. नागेश

	a	b	c	d
(A)	2	3	4	1
(B)	3	2	1	4
(C)	1	2	3	4
(D)	4	3	2	1

95. 'मराठी बखरींत या बखरीला भाषेच्या व विषयाच्या दृष्टीने स्वतंत्र स्थान दिले पाहिजे' असे द. वा. पोतदार यांनी कोणत्या बखरीच्या संदर्भात म्हटले आहे ?
(A) राक्षेसतागडीची बखर
(B) शालिवाहनाची बखर
(C) सभासदाची बखर
(D) श्रीसमर्थांची बखर

96. गोंडवंशातील पराक्रमी राजे शंकर शहा आणि रघूनाथशहा या क्रांतिकारकांचा इतिहास अधोरेखित करणारा 'दोन क्रांतिवीर' हा ग्रंथ कुणी लिहिला आहे ?
(A) डॉ. गोविंद गारे
(B) डॉ. विनायक तुमराम
(C) व्यंकटेश आत्राम
(D) बाबाराव मडावी

97. 'मोट्यारीन' हा गोंडी भाषेतील काव्यसंग्रह कुणी लिहिला आहे ?
(A) कुसुम आलाम
(B) वामन शेळमाके
(C) सुनील कुमरे
(D) उषाकिरण आत्राम

98. 'भारतीय भाषांतील स्त्रीवादी साहित्य' या ग्रंथाचे संपादन पुढीलपैकी कुणी केले आहे ?
(A) मेघना पेठे
(B) सुमती क्षेत्रमाडे
(C) उल्का महाजन
(D) अश्विनी धोंगडे

99. लेखक आणि कलाकृती यांच्या योग्य जोड्या लावा.

a. ज्योती लांजेवार	1. कमळकाचा
b. सुमती लांडे	2. तत्पुरूष
c. कविता महाजन	3. फिर्याद
d. हिरा बनसोडे	4. शब्द निळे आभाळ

	a	b	c	d
(A)	3	2	1	4
(B)	3	1	2	4
(C)	4	1	3	2
(D)	4	1	2	3

100. महानगरीय जीवन जाणिवांची छाप असलेल्या 'चित्रलिपी' ह्या काव्यसंग्रहाचे कवी कोण आहेत ?
(A) दि. पु. चित्रे
(B) वसंत आबाजी डहाके
(C) अरूण कोलटकर
(D) वसंत गुर्जर

Prepp
Your Personal Exams Guide



ROUGH WORK



Your Personal Exam Guide